दि. १० ऑक्टोबर २०२३

प्रति,
अनुराधा वजीरे मॅडम,
स्टेशन मॅनेजर,
एफ टि आय आय, पुणे

**विषय : आमचे सामाजिक कार्य समुदायापर्यंत पोहचण्यासाठी रेडियो कार्यक्रम करणे.**

नमस्कार महोदया,

मी सुनिल साहू गेले २३ वर्षे रामकृष्ण मठ, पुणे येथे Administrator / Accountant म्हणून कार्यरत आहे. येथे कार्य करीत असतांना श्रीरामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद आणि मा सारदादेवी यांच्या विचारांचा जवळून परिचय आला. बरीच पुस्तके वाचण्यात आली, यू ट्यूब वरील आध्यात्मिक, सामाजिक इत्यादी विष्यांवरचे लेक्चर ऐकण्यात आले आणि रामकृष्ण मठाचे सन्यासी वर्गाचा जवळून परिचय झाला. ह्याच बरोबर वेगवेगळे सामाजिक कार्य करीत असलेले विविध संस्थांचे मान्यवरांशी पण ओळख झाली, जसे डॉ. विकास आमटे, आनंदवन, डॉ. प्रकाश आणि मंदाकिनी आमटे, हेमलकसा, डॉ अभय बंग आणि राणी बंग मॅडम, सर्च फाउंडेशन, श्री. विजय फळणीकर, आपलं घर इत्यादी. आणि काही वर्षांपासून समाजासाठी आपणपण थोडसं खारीचा वाटा उचलावा असे मन सारखं खुणवू लागलं.

समाजासाठी काहीतरी तळमळ असणारे माझे परिवाराचे सदस्य आणि मित्र परिवार यांच्याशी चर्चा केली आणि त्यासर्वांचे प्रोत्साहनाने आणि पाठिंबा मिळाल्यामुळे २०२०च्या गुडी पाडव्यापासून मा सारदा फाउंडेशन ह्या सामाजिक संस्थेची अनौपचारिक सुरुवात झाली. इथे मला नोंद करावासे वाटते की मी २०२२ साली MSW (Masters in Social Work) ही पदवी IGNOU (Indira Gandhi National Open University) कडून मिळवली. माझ्या पावलांवर पाऊल ठेवून माझी मुलगी निर्मिती ही पण MSW (Masters in Social Work) Tilak Maharashtra Vidyapeeth मधून झाली. सध्या ती कोलंबस हेल्थ केअर सेंटर ह्या सामाजिक संस्थेत काम करीत आहे. माझ्याकडून करण्यात येत असलेले सामाजिक कार्यात तिच्याकडून खूप मदत मिळत आहे. तसेच माझी धर्मपत्नी सौ. निरुपमा ही पण गेले २२ वर्षे रामकृष्ण मठ, पुणे येथील पॉलिक्लिनिक मधे सोनोग्राफी विभागात कार्य करीत आहे. ती पण नौकरी करून, घर सांभालून मा सारदा फाउंडेशनच्या प्रत्येक कार्यात मदत करीत असते.

मा सारदा फाउंडेशन करीत असलेले सामाजिक कार्यबद्दल सांगाचं झालं तर आम्ही त्याला विविध उपक्रमात विभागलेले आहे –

**१) एक दिवस आनंदाचा :** ह्या उपक्रमा अंतर्गत आम्ही मा सारदा फाउंडेशनचे कार्यकर्ते महिन्याच्या एक किंवा दोन रविवारी एकत्र येतो आणि समाजासाठी झटणारे कुठल्याही एका NGO ला, जसे की अनाथाश्रम, वृद्धाश्रम, मतिमंद मुलांची शाळा, मूक-बधिर मुलांची शाला, HIV ग्रस्थ मुलांची शाला, अंध मुलांची शाळा, पर्यावरणावर कार्य करणारी संस्था, ग्रामीण भागात तिथले विद्यार्थ्यांसाठी कार्य करणारी संस्था इत्यादींना भेट देतो आणि त्यांच्या सोबत काही आनंदाचे तास व्यतित करतो. हे करीत

असताना आम्ही त्या संस्थेच्या कार्याचा आढावा घेतो आणि त्यांना त्यांच्या गरजेनुसार वस्तुस्वरूपात किंवा आर्थिक स्वरूपात साहाय्य करतो. आतापर्यंत आम्ही वेगवेगळे वस्तु जसे - क्रिडा साहित्य, किचन मधे उपयोगी पडणारे साहित्य, शाळेचे स्टेशनरी आणि वह्या-पुस्तके, किराणा, सोलार स्ट्रीट लाईट, नविन कपडे, दिवाळी फराळ इत्यादी त्यांना दिले आहेत. तसेच जर आपल्यापैकी कोणाचे वाढदिवस किंवा इतर कुठले कार्यक्रम असतील तर ते आम्ही त्या संस्थेमधे तिथले मुलांसोबत साजरे करतो. वरील उपक्रम करीत असतांना तिथले मुलं किंवा आजी-आजोबांचे चेहरेवरचे आनंद आम्ही अनुभवण्या प्रयत्न करीत असतो. आमच्या बरोबर जे तरुण वर्ग किंवा लहान मुलं येत असतात, त्यांच्या आयुष्यात पण खूप बदल झालेला आमचा अनुभव आहे.

**२) शैक्षणिक सेवाकार्य :** ह्या उपक्रमाद्वारे आम्ही शक्यतो ग्रामीणभागतील विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक, शालेय बॅग, स्टेशनरी, स्कोलरशीप इत्यादी देत असतो. तसेच वेळोवेळी विद्यार्थ्यांना उपयोगी पडणारे काही शिबिर, ज्यामध्ये Short term English Speaking course, Computer चे बेसिक ज्ञान, ओरोगामी, दिवाली किंवा नविन वर्षाचे ग्रेटिंग्स बनविणे इत्यादी सारखे कार्यक्रम घेत असतो.

**३) रुग्ण सेवा :** ह्या कार्यक्रमा द्वारे आम्ही गरजू रुग्णांना अल्प खर्चात वैद्यकीय सुविधा पुरविणारे हॉस्पिटल, CT Scan / MRI सेंटर, किंवा सर्जरी किंवा ऑपरेशन करणारे सामाजिक संस्था ह्याची माहिती देत असतो.

४) ABDM (Ayushman Bharat Digital Mission) : भारत सरकार द्वारे सुरु करण्यात आलेल्या ह्या उपक्रमाची माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवून त्यांना ABHA (Ayushman Bharat Health Account) Card बनवून देण्यात येते आणि Digilocker मध्ये त्यांचे वैद्यकीय रिपोर्टस, डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शन आणि इतर वैद्यकीय माहिती scan करुन upload करण्यात मदत करतो.

वरील कार्य करण्यात मा सारदा फाउंडेशनला आमचे सर्व मित्र-परिवार आणि बरेचशे दानशूर लोकांकडून आर्थिक किंवा वस्तुस्वरूपात साहाय्य मिलत असते. त्या सर्वांचे आम्ही आभारी आहोत. तसेच आम्ही लोकांना आव्हान करीत असतो कि त्यांनी त्यांच्या घरात साठवलेली रद्दी (Newspaper) आम्हाला दान म्हणून द्यावे. ही रद्दी विकून आम्ही त्यातून मिळाली रक्कम मा सारदा फाउंडेशनच्या विविध उपक्रमासाठी वापरत असतो.

आतापर्यंत मा सारदा फाऊंडेशन तर्फे आम्ही खालील सामाजिक संस्थांना भेटी देऊन त्यांच्या कार्याचा आढावा घेतला आहे -

१) Caring Hands Foundation (कलाश्रम), तळेगाव, पुणे)
२) अजित फाऊंडेशन, तळेगाव, पुणे
३) आपलं घर, डोणजे, पुणे
४) धायरी मूक-बधिर मुलांची निवासी शाला, धायरी, पुणे
५) विस्मय फाऊंडेशन, गुंजवणे, राजगड
६) सूर्योदय फाऊंडेशन, पुणे
७) Make my Dream Foundation, पुणे
८) Being Volunteer, Baner, पुणे

९) कल्याणछाया बहुउद्देशीय संस्था, पुणे
१०) बी. एल. मानकर सामाजिक संस्था, पुणे
११) नवरत्न वृद्धाश्रम, पुणे
१२) माऊली वृद्धाश्रम, पुणे
१३) सार्थक वृद्धाश्रम, डोणजे, पुणे
१४) ज्ञान गंगोत्री मतिमंद मुलांची शाला, पुणे
१५) माऊली प्रतिष्ठान, अहमदनगर
१६) शांतीवन, बीड
१७) सहारा अनाथालय, बीड
१८) सेवालय, लातूर
१९) शोधग्राम, गडचिरोली
२०) आनंदवन, वरोरा
२१) लोक बिरादरी प्रकल्प, हेमलकसा
२२) सोमनाथ प्रकल्प, चंद्रपूर

कोरोनाकाळात मा सारदा फाऊंडेशनतर्फे काही सामाजिक संस्थाच्या साहाय्याने आम्ही खालील उपक्रम राबविले :

* सूर्योदय फाउंडेशन या संस्थेला किराणा वाटप करण्यात आले, तसेच त्यांचे थकलेले काही महिन्याचे भाडे देण्यात आले.
* लुई ब्रेल अंध संस्था या संस्थेचे ६ महिन्याचे थकीत भाडे देण्यात आले.
* नवरत्न वृद्धाश्रम, माउली वृद्धाश्रम आणि आपलं घर, पुणे ह्या संस्थेला किराणा आणि मास्कचे वाटप करण्यात आले.
* मेक माय ड्रीम फाउंडेशन या संस्थेचे काही दिव्यांग बांधवाना आर्थिक आणि किराणा मदत करण्यात आले.
* कल्याणछाया बहुउद्देशीय संस्थेच्या मदतीने वारजे, कर्वे नगर, वेल्हे या ठिकाणी गरीब, गरजू आणि आदिवासी लोकांना किराणा आणि मास्कचे वाटप करण्यात आले.
* सूर्योदय फाउंडेशनच्या मदतीने वाई तालुक्यात आदीवासी बांधवांना कपडे वाटप करण्यात आले.

भविष्यात मा सारदा फाऊंडेशनद्वारे आम्हाला बरेचशे उपक्रम हाती घ्यायचे आहे. आमच्या मित्र-परिवाराकडून आम्हाला बरेचशे आर्थिक आणि वस्तूरूपात मदत मिळत आहे. पण तरीही आम्हाला अजून  बराच पल्ला गाठायचा आहे, जेणे करून जास्तित जास्त गरजू लोकांपर्यंत आणि सामाजिक संस्थांपर्यंत आम्ही पोहचू शकू.
रामकृष्ण मठाचा ब्रीडवाक्य आहे, 'आत्मनो मोक्षार्थं, जगत् हिताय च्'. या वाक्याला अनुसरून जगाचा कल्याण करण्याचा प्रयत्न जेव्हा आपण करतो तेव्हा खरं तर आपण स्वत:च्या मुक्तीसाठीच प्रयत्न करीत असतो.

तरी आपण मला रेडियो एफ टि आय आय च्या स्टेशन वर मुलाखत देण्यासाठी परवानगी देण्यात यावी हिच नम्र विनंती.

कळावे,
आपला

सुनिल साहू
मा सारदा फाउंडेशन
मो. 7350604684